॥ अल्पारंभ: क्षेमकर:॥

॥ अल्पारंभ: क्षेमकर: ॥
SWS Financial Solutions Pvt. Ltd.
Comprehensive Financial Consultancy & Services

Head Office : 2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle,
Near Hotel Curry Leaves, Gangapur Road, Nahik 422013

अंक : १७ वा ऑगस्ट २०१८

# गवाक्ष

......एक विचारमंच ! आर्थिक साक्षरतेसाठी

## संपादकीय...



नमस्कार !! सिंगल विंडो सर्व्हिसेस, आर्थिक सल्ला व गुंतवणूक क्षेत्रात, गेली २४ वर्षे कार्यरत आहे. ह्या क्षेत्रात कार्यरत असताना, गुंतवणूकदारां संबधितआलेल्याअनुभवांचा खजिना अमुल्य आहे. ह्या अनुभव संपत्तीद्वारे आम्ही आमची कार्यपद्धती अधिकाधिक सुधारीत करीत आलो आहोत. अनेक प्रकारच्या गुंतवणूकदारांशी बोलताना असे लक्षात येते की त्यांना जवळ असलेल्या धनाची जलदगतीने गुंतवणूक करायची असते. परंतु ती करताना, आपण केवळ रक्कम सांगावी आणि सांगितल्याप्रमाणे कागदपत्रे देऊन, सांगितल्या ठिकाणी सही करून, लवकर निर्णय अंमलात आणावा अशी घाई बरेचदा निदर्शनास येते. आर्थिक नियोजन ही बाब, आपल्या आणि आपल्या कुटूम्बियांच्या सम्पूर्ण आयुष्यावर परिणाम करणारी आहे. त्यामुळे असे नियोजन करताना, गुंतवणूकीचा हेतू आणि त्याचा लाभार्थी यांची संपूर्ण माहिती सादर करणे आवश्यक ठरते. अशा आणि या संदर्भातील इतर बाबी दुर्लक्षित होऊ नये, यासाठी आमची सिंगल विंडो टीम सदैव प्रयत्नशील असते जेणेकरून आपल्या आर्थिक नियोजनातून आपल्याला आपले इप्सित साध्य करता यावे. गवाक्ष च्या ह्या अंकामध्ये आर्थिक नियोजनासंबधित येणाऱ्या मुद्यांचा उहापोह केलेला आहे.

**श्री. रघुवीर अधिकारी,**
सी.ई.ओ.,
SWSFSPL

## आर्थिक नियोजन

बोली भाषेत 'अर्थ' म्हणजे पैसा. असं म्हणतात की 'अर्थ' असेल तर जीवनाला अर्थ आहे. पैशाचं जीवनामध्ये अनन्यसाधारण असं महत्व आहे. आपल्या दैनंदिन जीवनात उदरनिर्वाहासाठी प्रत्येकजण काहींना काही उद्योग करत असतो. खर्च करावा हेही महत्वाचे असते. सर्वसाधारणपणे काही पैसा आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी वापरावा लागतो तर उरलेला पैसा हा गुंतवणुकीसाठी ठेवला जातो. आपल्याकडे बऱ्याचदा पैसे कमावण्यासाठी जेवढे महत्व दिले जाते तेवढे त्याचे व्यवस्थापन/नियोजन (Financial Planning) करण्यास दिले जात नाही. त्याकडे आपण कानाडोळा करतो. नेहमीच डोळसपणे केलेली गुंतवणूक हि किफायतशीर ठरते. अनेकांना याची अर्थ नियोजनाची (Financial Planning) जाणीवसुद्धा नसते. बँकेमधील मुदतठेवी, पोष्टातल्या योजना किंवा विमा गुंतवणूक यापलीकडे बऱ्याच लोकांना काहीही माहित नसते. याचे मुख्य कारण म्हणजे अर्थसाक्षरतेचा अभाव असणे होय. झटपट श्रीमंत होण्याची जादूची कांडी किंवा अचाट शक्ती सद्य जगात तरी अस्तित्वात नाही कुठं उपलब्ध असेल तर आम्हाला जरूर कळवा. त्यासाठी अर्थ नियोजन (Financial Planning) हाच एकमेव पर्याय आहे.

उपलब्ध साधन संपत्तीचे विवेकाने सुनियोजन करून संपत्तीमध्ये वाढ करणे (आर्थिक उद्दिष्ट साध्य करणे) म्हणजे अर्थ नियोजन होय.

**आर्थिक नियोजनातील महत्वाचे घटक:**

१. सध्याचे वय – Today's Age
२. आयुष्यात तुमच्या आर्थिक अपेक्षा काय आहेत यात स्पष्टता असावी – Financial Goals
३. सद्य आर्थिक स्थिती – Current Financial Position
४. नियोजनाचा कालावधी – Term of Financial Planning
५. काटेकोरपणे अंमलबजावणी – Implementation
६. मूल्यमापन – Monitoring and Evaluation
७. भावनिक निर्णयांना येथे थारा नाही – No Emotional Decision

८. अर्थ सल्लागाराची मदत – Help of Financial Planner

हे घटक विस्तृतपणे समजाऊन घेऊ.

१) सध्याचे वय (Current Age) – सध्याचे वय म्हणजे नियोजनाच्या वेळी असलेले वय. हा खूप महत्वाचा मुद्दा आहे. प्रत्येक वयासाठी आर्थिक नियोजन हे वेगळे असते. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आर्थिक नियोजनाचा सूर बदलतो.

२) आर्थिक उद्दीष्ट (Financial Goal) – वयानुसार प्रत्येकाचे आर्थिक उद्दिष्ट बदलते (काही प्रमाणात बदलते). लघु मुदतीचे आणि दीर्घ मुदतीचे उद्दिष्ट यांची पूर्ण यादी करा. आर्थिक उद्दिष्ट ठरवताना हे लक्षात असुद्या.

१. आर्थिक उद्दिष्ट ठरवताना त्यामध्ये वास्तविकता आणि स्पष्टता असावी.
२. उद्दिष्ट जितके वास्तविक तितके गाठणे सोपे असते.
३. उद्दिष्ट ठरवताना किमान आपण स्वतःशी तरी प्रामाणिक असणे गरजेचे आहे.

उदा. मला श्रीमंत व्हायचंय म्हणजे नेमकं काय. कारण प्रत्येकाची श्रीमंत असण्याची व्याख्या वेगळी असू शकते. कुणाला १ लाख म्हणजे श्रीमंत वाटेल तर कुणाला १ कोटी. मुद्दा असा कि उद्दिष्ट स्पष्ट असावे.

३) सद्य परिस्थीचा आढावा (Current Financial Position ) – याचा अर्थ सध्या आर्थिक स्थिती काय आहे याचा बारकाईने आणि सूक्ष्म रीतीने अभ्यास करणे. यात प्रामाणिक असणे खूप गरजेचे आहे. कारण हाच आपला अर्थ नियोजनाचा पाया आहे. उद्दिष्ट कसे गाठायचे आहे हे यावरून स्पष्ट करता येते.

४) नियोजनाचा कालावधी (Term of Financial Planning) – आपण कोणते उद्दिष्ट गाठण्यासाठी किती वेळ देणार आहोत याची रीतसर मांडणी

५) काटेकोरपणे अमलबजावणी (Implementation)– केलेल्या नियोजनाची काटेकोरपणे अमलबजावणी केलीं पाहिजे. धरसोड वृत्ती येथे चालत नाही. कोणतेही नियोजन काटेकोरपणाशिवाय तडीस जाऊ शकत नाही.

६) मूल्यमापन (Monitoring and Evaluation): ठरवलेल्या उद्दिष्टाचे वेळोवेळी मूल्यमापन करावे. स्थळ, काळ, वेळ आणि नियम यानूसार यात बदल होत जातात. त्याचे अवलोकन करावे. गरज पडल्यास नियोजनात योग्य तो बदल करावा. आपले उद्दिष्ट साध्य होत आहे ना त्याकडे लक्ष असू द्यावे.

७) भावनिक निर्णयांना येथे थारा नाही (Emotional Decision without thinking of its affect)– आर्थिक नियोजन करताना कोणताही भावनिक निर्णय घेऊ नये. हा नियोजन विस्कळीत करणारा महत्वाचा घटक आहे. आपत्कालीन गरजांसाठी वेगळी तरतूद असावी.

८) अर्थसल्लागाराची मदत (Help of Finance Planner) – परिपूर्ण अर्थ नियोजनासाठी सातत्याने अभ्यास असणे गरजेचे आहे. सर्वांनाच हे काही शक्य होत नाही. त्यासाठी अर्थ सल्लागार Financial Planners/Consultants उपलब्ध असतात.

आता आर्थिक नियोजनातील संभाव्य चुका ही पाहूयात

**आर्थिक नियोजनातील चुका:**

१. उद्दिष्ट स्पष्ट नसणे किवा त्यात वास्तविकता नसणे.
२. परीणामाची गांभीर्यता लक्षात न घेता भावनिक निर्णय घेणे.
३. आर्थिक नियोजना वर वेळोवेळी मूल्यमापन न करणे
४. आर्थिक नियोजन हे फक्त निवृत्तीसाठी आहे हा गैरसमज असणे.
५. आर्थिक नियोजन हे फक्त श्रीमंत लोकांनीच करावे
६. कमी रकमेसाठी अर्थनियोजन उपयोगाचे नसते. (आपल्याकडे पुरेसे पैसे आले कि बघू अशी मानसिकता असणे).
७. पैश्यातील काही रक्कम बचत केली म्हणजे गुंतवणूक होय.
८. अवास्तव मिळकतीची अपेक्षा करणे.
९. आर्थिक नियोजनासाठी योग्य वेळेची वाट बघणे
१०. आर्थिक नियोजनासाठी योग्य सल्लागाराची मदत न घेणे.

आर्थिक नियोजनातील महत्वाच्या घटकांचा योग्य, वास्तविक विचार करून आणि संभाव्य चूका टाळून केलेले नियोजन नक्कीच लाभदायी, मानसिक समाधान देणारे ठरते. आणि असे नियोजन S.E.B.I. रजिस्टर अर्थ सल्लागाराची मदत घेऊन करणेच श्रेयस्कर !!

Source: http://marathimoney.com

# विशेष उल्लेखनीय !



२८ जुलै २०१८: शब्द मल्हार आणि मुक्तांगण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाचक कट्टा मध्ये पहिले पुष्प गुंफताना प्रा. पं. नितीन वारे. लयवंत तालयोगी अहमदजान थीरकवा यांच्या तबलावादन कलेसंदर्भात, त्यांनी रसिकांशी संवाद साधला.



४ ऑगस्ट २०१८: मुक्तांगण तर्फे आयोजित हस्तकला शिबीरात सहभागी झालेले बालदोस्त.




११ ऑगस्ट २०१८:
**Wealth Creation** सेमिनार मध्ये, उपस्थितांना मार्गदर्शन करताना श्री. रघुवीर अधिकारी

**१२ ऑगस्ट २०१८:**
**मुक्तांगण आयोजित राखी वर्कशॉप मध्ये सहभगी बालदोस्त.**






**Mutual Fund Round Table (MFRT)**
**४-५ ऑगस्ट २०१८, दिल्ली, येथे सहभागी टीम SWS चे नासिक, पुणे, मुंबई आणि नागपूर शाखांचे प्रमुख.**

॥ अल्पारंभ: क्षेमकर: ॥

SWS Financial Solutions Pvt. Ltd.

Comprehensive Financial Consultancy & Services

Head Office : 2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle, Near Hotel Curry Leaves, Gangapur Road, Nahik 422013

**SWS Mumbai Branch**
07, Zee Usha Swapna, Mahant Road Junction,
Hanuman Cross Road, No.1,
Vile Parle (East) Mumbai 400057
**Kishor Kale : 9869239940/ 9224433122**

**SWS Pune Branch**
Office No.1, Anand Corner,Anand Park,
Wadgaonsheri, Pune - 411 014.
**Swapnil Ekande : 9828735055 / 7720099241**

**SWS Nagpur Branch**
Plot No. 30, Mandar Apartment,
Inline of Anandpurti Super Bazar,
Khamla-Jaitala Road, Nagpur - 440025.
**Neeraj Adbe : 8308833724**

**SWS Wardha Branch**
C/o.S.Sardar, Seneguruji Nagar,
Bachelor Road, Wardha - 442001.
**Girish N. Wankhede : 9970835446**